ePaper

त्रिपुरामध्ये बीएसएफच्या जवानांवर जीवघेणा हल्ला, 3 महिलांसह 9 जणांना अटक

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज™



पान 3 वरुन...

शगुन चौकात मध्यरात्री आगीचा कहर!

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 04 नोव्हेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

पंतप्रधान मोदींच्या हस्ते पुण्याच्या विकासाला नवी गती

हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो लोकार्पित

महाईन्यूज । पुणे

पुण्याच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महत्त्वाची भर घालत माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गिका-३ चे लोकार्पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. २३.२०३ किलोमीटरच्या या मार्गामुळे हिंजवडीतील आयटी क्षेत्र थेट शिवाजीनगरशी जोडले जाणार असून, हजारो कर्मचाऱ्यांचा प्रवास वेगवान होणार आहे. यावेळी पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातील विस्तारित मार्गांचे भूमिपूजनही करण्यात आले.





या कार्यक्रमाला राज्यपाल जिष्णु देव वर्मा, केंद्रीय मंत्री मनोहर लाल (दूरदृश्य प्रणालीद्वारे), मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत दादा पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महापौर मंजुषा नागपुरे, पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे आणि खासदार श्रीरंग बारणे उपस्थित होते.

प्रधानमंत्री मोदी म्हणाले की, पुणे हे आयटी, ऑटोमोबाईल, फार्मा आणि उत्पादन क्षेत्रातील महत्त्वाचे केंद्र आहे. मेट्रोमुळे प्रवासाचा वेळ वाचून आर्थिक विकासाला चालना मिळेल. २०१४ मध्ये देशात २४८ किलोमीटरचे मेट्रो मार्ग होते. आज हे जाळे १२०० किलोमीटरपर्यंत विस्तारले असून, २६ शहरांत मेट्रो सेवा सुरू आहे. महाराष्ट्रात सुमारे २०० किलोमीटरचे मार्ग सेवेत आहेत. संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार ठामपणे उभे असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०३० पर्यंत पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआर देशातील महत्त्वाचे मोबिलिटी केंद्र बनेल, असा विश्वास व्यक्त केला. मेट्रो, इलेक्ट्रिक बस, इनर-आउटर रिंगरोड आणि बोगद्यांचे जाळे विकसित होत असून, हिंजवडीतील आयटी कर्मचाऱ्यांना वाहतूक कोंडीतून दिलासा मिळणार आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारीतून उभारलेला हा देशातील पहिला मेट्रो प्रकल्प असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मेट्रोमुळे वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवास अधिक सुरक्षित आणि आरामदायी होईल, असे नमूद केले. आतापर्यंत ९० लाखांहून अधिक प्रवाशांनी पुणे मेट्रोला पसंती दिली आहे. पुणे-मुंबई मिसिंग लिंक आणि रिंगरोडमुळेही वाहतुकीचा ताण कमी होईल. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या योगदानाचाही त्यांनी उल्लेख केला.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या की, ८ हजार ३१३ कोटी रुपये खर्चून उभारलेली मार्गिका-३ देशातील पहिली १०० टक्के महिला संचालित मेट्रो ठरणार आहे. सुमारे ९० महिला ट्रेन पायलट आणि ५० टक्के महिला कर्मचारी संचालनाची जबाबदारी सांभाळतील. दुसऱ्या टप्प्यातील चार विस्तारित मार्गिकांसाठी ९ हजार ८५८ कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मंजुरी मिळाली आहे. वनाज-चांदणी चौक, रामवाडी-विठ्ठलवाडी, कोथरूड, बावधन, विमाननगर, खराडी आणि वाघोली हे भाग जोडले जाणार आहेत. या प्रकल्पात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी या मार्गामुळे पुणे मेट्रोचे जाळे ५५ किलोमीटरपर्यंत विस्तारणार असल्याचे सांगितले. सप्टेंबरमध्ये मेट्रोतून ९ लाख ५८ हजार ६०३ प्रवास झाले. खडकवासला-खराडी, वनाज-चांदणी चौक, रामवाडी-वाघोली आणि मानिकबाग-नळस्टॉप या नव्या मार्गांमुळे शहराची जोडणी अधिक सक्षम होणार आहे. पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी आणि पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल कुमार सैनी उपस्थित होते.

महिला शक्तीच्या हाती मेट्रोची धुरा!

पुणे मेट्रोच्या संचालनात महिलांचा मोठा सहभाग असणार आहे. तब्बल ९० महिला ट्रेन चालक मेट्रो चालविणार असून, एकूण कर्मचाऱ्यांमध्ये महिलांचे प्रमाण ५० टक्के आहे. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने हा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

पुण्याच्या मेट्रोला नवी झेप!

हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो सेवेमुळे आयटी नगरीतील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. २३.२०३ किलोमीटरच्या मार्गावर २३ स्थानके असून, ९० महिला चालक मेट्रोचे संचालन करणार आहेत. यासोबतच ३१ किलोमीटरच्या विस्तारित मेट्रो मार्गांचेही भूमिपूजन करण्यात आले.



दिवाळीनिमित्त पुण्यातील मध्य भागात बंदोबस्त!

गर्दी, वाहतूक नियोजनावर विशेष लक्ष; पोलीस आयुक्तांची माहिती

महाईन्यूज । पुणे

'दिवाळीनिमित्त मध्य भागात खरेदीसाठी गर्दी होत आहे. खरेदीसाठी येणारे नागरिक, वाहतूक नियोजनासाठी पोलिसांकडून अतिरिक्त बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गर्दीत महिलांकडील दागिने, रोकड चोरीला घटना घडतात. स्थानिक पोलिसांसह गुन्हे शाखेची पथके तैनात करण्यात आली आहेत,' अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी दिली.





'दिवाळीनिमित्त मध्य भागातील लक्ष्मी रस्ता, कुमठेकर रस्ता, महात्मा फुले मंडई, शनिपार परिसरात खरेदीसाठी गर्दी होत आहे. खरेदीसाठी पुणे शहर, जिल्ह्यातून नागरिक विशेषत: महिला मोठ्या संख्येने येतात. गर्दीवर नियंत्रण ठेवणे, तसेच वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून पोलिसांकडून बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गर्दीत होणाऱ्या चोऱ्या रोखण्यासाठी स्थानिक पोलिसांसह गुन्हे शाखेच्या पथकांना गस्त घालण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. वाहतूक पोलिसांकडून मध्य भागात अतिरिक्त बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. वाहतूक शाखेतील पोलिसांना वाहतूक स्वयंसेवकांकडून सहाय्य केले जात आहे. गर्दीत गैरप्रकार केल्याचे आढळून आल्यास त्वरित कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत,' असे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी सांगितले.

'सणासुदीच्या काळात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून प्रत्येक पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना सूचना देण्यात आल्या आहेत. वाहतूक सुरळीत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. व्यावसायिकांनी पोलिसांना सहकार्य करावे, तसेच दुकानासमोर बेकायदा पथारी व्यावसायिकांना व्यवसाय करण्यास परवानगी देऊ नये', असे त्यांनी नमूद केले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिपार चौक परिसरात रविवारी (१ नोव्हेंबर) दुपारी साडेचारच्या सुमारास महिलेच्या पिशवीतून सात हजार रुपयांची रोकड लांबविण्यात आली. या बाबत एका महिलेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दुसऱ्या घटनेत तुळशीबागेत खरेदीसाठी आलेल्या एका महिलेच्या पिशवीतून चोरट्यांनी १४ हजार ७८८ रुपये लांबविले. रविवारी सायंकाळी हा प्रकार घडला. याबाबत एका महिलेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

खरेदीच्या गर्दीत रोकड चोरी

दिवाळीनिमित्त मध्य भागात खरेदीसाठी आलेल्या दोन महिलांच्या पिशवीतून रोकड चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली. शनिपार आणि तुळशीबाग परिसरात या घटना घडल्या. या प्रकरणी विश्रामबाग पोलीस ठाण्यात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

बोनस मिळणार! पुणे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांसह कंत्राटी कामगारांना बक्षीस

महाईन्यूज । पुणे

दिवाळी सण आनंदाचा आणि उत्साहाचा असल्याने कंपनी अथवा कोणतीही संस्था ही आपल्या कर्मचाऱ्यांना खुश करण्यासाठी आनंदोत्सव साजरा करण्यासाठी वेतना पेक्षा अधिक रक्कम देते. मुंबई महापालिकेने कर्मचाऱ्यांना बोनस जाहीर केल्याची घोषणा काही दिवसांपूर्वीच केली होती. अशीच घोषणा आता पुणे महापालिकेने केली आहे. पुणे महापालिकेने कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांसह कंत्राटी कामगारांना देखील दिवाळी बोनस जाहीर केला आहे.



स्थायी समितीने मान्यता दिल्याने पुणे महापालिकेत काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना बोनस देण्यात येणार आहे. यामध्ये १८ हजार अधिकारी कर्मचाऱ्यांसह ११ हजार कंत्राटी कामगारांना प्रत्येकी दहा हजार रुपये बक्षीस देण्यात येणार आहे. यामध्ये असणारे ११ हजार कंत्राटी कामगार हे विविध विभागांमध्ये कार्यरत असणारे आहेत. दिवाळीसाठी आर्थिक हातभार हा कर्मचाऱ्यांना देण्यात येणार आहे.

कर्मचाऱ्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम

या प्रस्तावाला स्थायी समितीने मान्यता दिली असली तरी मुख्य सभेची अंतिम मंजुरी मिळणे गरजेचे आहे. मुख्य सभेची अंतिम मंजूरी मिळाल्यानंतर प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यात येतील आणि त्यानंतर कर्मचाऱ्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम जमा केली जाणार आहे.

महापालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह शिक्षकांना देखील याचा फायदा मिळणार आहे. यामध्ये प्राथमिक शिक्षण विभागातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी, माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभागातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी, अंगणवाडी शिक्षिका आणि अंगणवाडी सेविका यांनाही लाभ मिळणार आहे.

यामध्ये नियमित कर्मचाऱ्यांना वेतनाच्या८.३३ टक्के रकमेसोबत २७ हजार रुपये अनुदान मिळणार आहे. हे अनुदान सानुग्रह मिळणार आहे. येत्या २०२९-३० या आर्थिक वर्षात ३५ हजार रुपयांपर्यंत ही रक्कम वाढणार आहे. तसेच दरवर्षी दोन हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशी माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली.

बोनसचे स्वरुप पुढीलप्रमाणे

- १० हजार रुपये- प्रत्येक कंत्राटी कामगाराला बक्षीस
- २७ हजार रुपये - अतिरिक्त अनुदान
- १८ हजार -महापालिका अधिकारी व कर्मचारी
- ११ कोटी रुपये- कंत्राटी कामगारांच्या बक्षिसापोटी अपेक्षित खर्च
- ११ हजार - कंत्राटी कामगार
- ३५ हजार रुपये -२०२९-३० मधील अतिरिक्त अनुदान
- ८.३३ टक्के - वेतनाच्या प्रमाणात सानुग्रह अनुदान
- २ हजार रुपये - दरवर्षी अतिरिक्त अनुदानातील प्रस्तावित वाढ


शगुन चौकात मध्यरात्री आगीचा कहर!

पूजा साहित्याची दोन दुकाने जळून खाक; अग्निशमन दलाच्या धाडसाने मोठी दुर्घटना टळली

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपरीतील शगुन चौक परिसरात मध्यरात्री दोन पूजा साहित्याच्या दुकानांना भीषण आग लागल्याची घटना घडली. मध्यरात्री १२.४९ वाजता आगीची माहिती मिळताच पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मुख्य अग्निशमन केंद्रासह नेहरूनगर, थेरगाव आणि रहाटणी केंद्रांतील जवानांनी संयुक्तपणे राबविलेल्या मोहिमेमुळे आग आटोक्यात आणण्यात यश आले. आगीने आसपासच्या दुकानांनाही विळखा घालण्याची शक्यता होती; मात्र जवानांच्या तत्पर कारवाईमुळे मोठे नुकसान टळले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, आग विझविताना दोन अग्निशमन जवान किरकोळ जखमी झाले.





मध्यरात्री अचानक लागलेल्या आगीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच चार अग्निशमन केंद्रांतील पथके घटनास्थळी दाखल झाली. जवानांनी सर्वप्रथम दुकानांमध्ये कोणी अडकले आहे का, याची खातरजमा केली. त्यानंतर विविध दिशांनी पाण्याचा मारा करीत आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. दोन्ही दुकानांमध्ये पूजा साहित्य आणि इतर वस्तूंचा मोठा साठा असल्याने साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

या मोहिमेदरम्यान फायरमन प्रणय शिर्के आणि फायरमन आदिल गोडे हे दोन जवान किरकोळ जखमी झाले. त्यांना तातडीने वायसीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपआयुक्त व्यंकटेश दुर्वास यांच्या मार्गदर्शनाखाली उपअग्निशमन अधिकारी गौतम इंगवले, लीडिंग फायरमन विजय घुगे यांच्यासह विविध अग्निशमन केंद्रांतील जवानांनी या मोहिमेत सहभाग घेतला. जवानांच्या समन्वयपूर्ण कामगिरीमुळे आग लगतच्या दुकानांपर्यंत पोहोचण्यापूर्वीच नियंत्रणात आणता आली.

दरम्यान, आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी घाबरून न जाता शांतता राखावी. आग लागल्याचे निदर्शनास आल्यास तातडीने १०१ या अग्निशमन दलाच्या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधावा आणि घटनेची स्पष्ट माहिती द्यावी, असे आवाहन महापालिकेच्या अग्निशमन विभागाने केले आहे.

> “नागरिकांचे जीवित आणि मालमत्तेचे संरक्षण करणे हे महापालिकेच्या अग्निशमन दलाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. शगुन चौक येथील आगीच्या घटनेत जवानांनी तत्परतेने आणि समन्वयाने केलेल्या कारवाईमुळे आग लगतच्या दुकानांमध्ये पसरण्यापासून रोखता आली आणि मोठी दुर्घटना टळली. या मोहिमेदरम्यान जखमी झालेल्या जवानांना तातडीने वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यात आले आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रतिकूल परिस्थितीतही कर्तव्य बजावणाऱ्या अग्निशमन जवानांची कर्तव्यतत्परता आणि धाडस निश्चितच कौतुकास्पद आहे.”
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

कर्मचारी महासंघाच्या करारामुळे हजारो कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड..!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. कर्मचारी महासंघाने प्रशासनासोबत केलेल्या पंचवार्षिक करारामुळे यंदाही पात्र कर्मचाऱ्यांना ८.३३ टक्के बोनस आणि प्रत्येकी ३० हजार रुपये सानुग्रह अनुदान मिळणार आहे. महासंघाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे कर्मचाऱ्यांच्या आर्थिक हिताचे संरक्षण झाले असून, सणासुदीच्या काळात हजारो कर्मचारी कुटुंबांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे.





महापालिका कर्मचाऱ्यांना दरवर्षी बोनस आणि सानुग्रह अनुदान मिळावे, यासाठी कर्मचारी महासंघाने प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यातून पाच वर्षांसाठी बोनस व सानुग्रह अनुदानाबाबत पंचवार्षिक करार करण्यात आला. या करारामुळे दरवर्षी नव्याने चर्चा आणि संघर्ष करण्याची गरज कमी झाली असून, कर्मचाऱ्यांना आर्थिक लाभाबाबत निश्चितता मिळाली आहे.

यंदाही या कराराची अंमलबजावणी होत असल्याने पात्र कर्मचाऱ्यांना ८.३३ टक्के बोनस आणि ३० हजार रुपये सानुग्रह अनुदानाचा लाभ मिळत आहे. महागाईच्या पार्श्वभूमीवर मिळणारी ही रक्कम कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. विशेषतः सण-उत्सव, कौटुंबिक गरजा आणि दैनंदिन खर्चासाठी या आर्थिक मदतीचा उपयोग होणार आहे.

महासंघाच्या या करारामुळे कर्मचाऱ्यांना दरवर्षी बोनस आणि सानुग्रह अनुदानासाठी नव्याने मागणी करण्याची वेळ येणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यामुळे महापालिका कर्मचाऱ्यांच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने हा करार महत्त्वाचा ठरत आहे.

> “महापालिका कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी महासंघ सातत्याने संघर्ष करीत आहे. कर्मचाऱ्यांना मिळणारा बोनस आणि सानुग्रह अनुदान हा त्यांच्या हक्काचा तसेच महासंघाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा विजय आहे. कर्मचाऱ्यांचे आर्थिक हित जपण्यासाठी हा पंचवार्षिक करार महत्त्वपूर्ण ठरला आहे. भविष्यातही कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी महासंघ ठामपणे प्रयत्नशील राहील.”
>
> **- शशिकांत ऊर्फ बबनराव झिंजूर्डे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ**

भूमिका

विकासाच्या नावाखाली सह्याद्रीची कत्तल!



कर्जतजवळील साई-डोंगर वनक्षेत्रात टॉरेंट पॉवर कंपनीकडून उभारण्यात येणारा तीन हजार मेगावॉट क्षमतेचा पंप्ड स्टोरेज जलविद्युत प्रकल्प सध्या पर्यावरणीय वादाच्या केंद्रस्थानी आहे. सुमारे ३० हजार कोटी रुपयांच्या या प्रकल्पासाठी २३३ हेक्टर वनजमिनीवरील तब्बल ३२ हजार ४९० परिपक्व झाडे तोडण्याचे नियोजन आहे.

देशाच्या ऊर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी आणि स्वच्छ ऊर्जेला चालना देण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा असला, तरी त्यासाठी पश्चिम घाटातील समृद्ध वनसंपदेचा बळी देणे कितपत योग्य, हा मूलभूत प्रश्न आहे.

पश्चिम घाट हा केवळ डोंगराळ प्रदेश नाही, तर जैवविविधतेचा अनमोल ठेवा आहे. असंख्य वन्यजीव, दुर्मिळ वनस्पती, नैसर्गिक जलस्रोत आणि स्थानिकांचे जीवन या जंगलांशी जोडलेले आहे. त्यामुळे हजारो वर्षांत विकसित झालेली परिसंस्था काही दिवसांत उद्ध्वस्त करून तिची भरपाई नव्याने लावलेल्या रोपांनी होईल, असे मानणे चुकीचे ठरेल. कंपनीच्या म्हणण्यानुसार, प्रकल्पातून होणारी कार्बन बचत वृक्षतोडीची पर्यावरणीय भरपाई दहा दिवसांत करू शकते. तसेच २५३ हेक्टर जमिनीवर ३० ते ६० हजार झाडे लावण्याचे नियोजन आहे. मात्र, हा दावा प्रत्यक्षात किती यशस्वी होणार, याची खात्री कोण देणार?

पूरक वनीकरणाची संकल्पना कागदावर आकर्षक वाटत असली, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक त्रुटी आहेत. वृक्षारोपणानंतर रोपांची निगा, पाणीपुरवठा, संरक्षण आणि नियमित देखरेख यांचा अभाव दिसतो. अनेक ठिकाणी लावलेल्या रोपांपैकी निम्मीच झाडे जगत असल्याचे निरीक्षण समोर आले आहे. शिवाय, जुन्या जंगलातील जैवविविधता, नैसर्गिक अधिवास आणि जलस्रोतांची जागा नवीन लागवड सहज घेऊ शकत नाही. मोठ्या वृक्षांची निर्मिती होण्यासाठी अनेक दशके लागतात, ही बाबही दुर्लक्षित करता येणार नाही.

त्यामुळे वृक्षतोड अपरिहार्य असल्याचा दावा करण्यापूर्वी पर्यायी जागांचा आणि तांत्रिक पर्यायांचा सखोल अभ्यास झाला पाहिजे. प्रकल्पाच्या पर्यावरणीय परिणामांचे स्वतंत्र पुनर्मूल्यांकन करणे आवश्यक आहे. वृक्षारोपणाची जबाबदारी स्थानिक ग्रामस्थ आणि आदिवासी समुदायांना देऊन त्यांना रोजगार उपलब्ध करून देता येईल. प्रत्येक झाडाचे जिओ-टॅगिंग, उपग्रहाद्वारे निरीक्षण आणि जगलेल्या झाडांची सार्वजनिक नोंदणी बंधनकारक करावी. केवळ रोपे लावल्याचे आकडे न मांडता ती प्रत्यक्ष किती जगली, याचा हिशेब द्यावा.

विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष निर्माण होणे ही दुर्दैवी बाब आहे. सरकार, कंपनी, पर्यावरणतज्ज्ञ आणि ग्रामस्थ यांची संयुक्त समिती स्थापन करून पारदर्शक चर्चा घडवून आणली पाहिजे. ग्रामसभांची संमती आणि स्थानिकांच्या चिंतांना प्राधान्य मिळाले पाहिजे. स्वच्छ ऊर्जेच्या नावाखाली निसर्गाचे नुकसान करून हरित विकासाचा दावा करता येणार नाही. सह्याद्रीचे जंगल एकदा नष्ट झाले, तर त्याची भरपाई केवळ कागदावरील वृक्षारोपणाने होणार नाही. म्हणूनच ३२ हजार झाडे तोडण्यापूर्वी प्रत्येक पर्याय तपासणे, हाच खऱ्या अर्थाने शाश्वत विकासाचा मार्ग आहे.

प्रासंगिक »

टीकेतून प्रगती!

एका गावात चित्रकलेची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. गावातील अनेक चित्रकारांनी त्यात भाग घेतला. प्रत्येकाने आपापल्या परीने सुंदर चित्रे काढली. परीक्षकांनी सर्व चित्रांचे निरीक्षण केले; मात्र अंतिम निर्णय घेणे कठीण झाले.

तेव्हा एका वृद्ध चित्रकाराने एक वेगळा प्रस्ताव मांडला. त्याने सर्व चित्रे गावातील सार्वजनिक ठिकाणी लावण्यास सांगितली आणि प्रत्येक चित्राखाली एक प्रश्न लिहिला, 'या चित्रात कोणती सुधारणा करता येईल?' गावकऱ्यांनी आपापल्या सूचना लिहून दिल्या.

काही चित्रांवर अनेक चुका दाखवण्यात आल्या, तर काही चित्रांना फार कमी सूचना मिळाल्या. त्यानंतर चित्रकारांना आपल्या चित्रांमध्ये सुधारणा करण्याची संधी देण्यात आली. बहुतेक चित्रकार टीका ऐकून नाराज झाले; मात्र एका तरुणाने प्रत्येक सूचना शांतपणे वाचली आणि चित्रात आवश्यक बदल केले.

अंतिम फेरीत त्याचे चित्र सर्वांत सुंदर ठरले. वृद्ध चित्रकार म्हणाला, 'कौतुक माणसाला आनंद देते; पण योग्य टीका त्याला अधिक चांगले बनवते.'"

- तात्पर्य : टीका टाळण्यापेक्षा त्यातून शिकण्याची वृत्ती माणसाला यशस्वी बनवते.

लोकशाही व्यवस्थेत सत्ताधारी आणि विरोधक यांची भूमिका वेगवेगळी असते. विरोधक सरकारच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करतात, तर सत्ताधाऱ्यांनी त्या प्रश्नांना उत्तर देत कारभाराची जबाबदारी पार पाडायची असते.

रामलल्लापासून रामलीलेपर्यंतचे राजकारण!

मात्र, विरोधकांच्या आंदोलनाला प्रत्युत्तर देण्यासाठी सत्ताधारी पक्षानेही रस्त्यावर उतरून आंदोलने करणे, हे राजकीय व्यवस्थेतील बदलते चित्र आहे. दिल्लीतील रामलीला मैदानावर काँग्रेसने आयोजित केलेल्या सभेला मिळालेला प्रतिसाद आणि त्यानंतर भाजपने केलेली आंदोलने यामुळे राजकीय संघर्षाला नवे वळण मिळाले आहे.



काँग्रेसने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करत निवडणूक प्रक्रियेतील कथित गैरव्यवहारांविरोधात आंदोलन केले. निवडणूक प्रक्रियेबाबत शंका उपस्थित करणे आणि त्यावर स्पष्टीकरण मागणे हा विरोधकांचा लोकशाही अधिकार आहे. या आरोपांमध्ये तथ्य आहे की नाही, हे तपासून स्पष्ट करणे निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे. आयोगासारख्या स्वायत्त संस्थेने स्वतःच्या कामकाजातून विश्वासार्हता सिद्ध करणे अपेक्षित असताना सत्ताधारी पक्षाने त्याची बाजू घेण्यासाठी पुढे येणे योग्य ठरत नाही. त्यामुळे आयोगाच्या स्वायत्ततेबाबतच प्रश्न निर्माण होऊ शकतात.

रामलीला मैदानावरील सभेला मिळालेला प्रतिसादही राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा आहे. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली विरोधी पक्षांचे नेते एकत्र आले. त्यामुळे विरोधकांमधील एकजूट आणि राहुल गांधी यांचे नेतृत्व अधोरेखित झाले. भाजपनेही काँग्रेसच्या आरोपांना प्रत्युत्तर देण्यासाठी आंदोलनांचा मार्ग स्वीकारला. मात्र, सत्ताधाऱ्यांनी लोकशाही वाचवण्याची हाक देणे विसंगत वाटते. केंद्रात आणि अनेक राज्यांत सत्ता असताना लोकशाही धोक्यात असल्याचा दावा करायचा असेल, तर त्यामागील ठोस कारणेही स्पष्ट करावी लागतील.

अराजक, घुसखोरी आणि परकीय हस्तक्षेपाचे आरोप करून जनतेमध्ये भीती निर्माण करण्याऐवजी त्यासंबंधी ठोस पुरावे सादर करणे आवश्यक आहे. विरोधकांना चीनकडून आर्थिक मदत मिळत असल्याचा आरोपही गंभीर आहे. असे पुरावे असतील तर संबंधित यंत्रणांनी त्याची चौकशी करून कारवाई करावी. केवळ राजकीय आरोपांच्या आधारे जनमत प्रभावित करण्याचा प्रयत्न लोकशाहीसाठी हितकारक नाही. राममंदिरापासून सुरू झालेला राजकीय प्रवास आता रामलीला मैदानापर्यंत पोहोचला आहे. मात्र, लोकशाही ही केवळ सत्ताधारी किंवा विरोधकांची मक्तेदारी नाही. प्रश्न विचारण्याचा अधिकार विरोधकांना आहे आणि त्यांना उत्तर देण्याची जबाबदारी सत्ताधाऱ्यांची आहे. आंदोलनांच्या माध्यमातून शक्तिप्रदर्शन करण्यापेक्षा जनतेच्या प्रश्नांवर काम करणे अधिक महत्त्वाचे आहे. अखेर लोकशाहीचे खरे रक्षण सत्तेच्या प्रदर्शनातून नव्हे, तर संविधानिक मूल्यांचा आदर आणि जनतेच्या विश्वासातूनच होते.

।। अभंगवाणी ।।



मांडवाच्या दारा ।
पुढें आणिला म्हातारा ॥१॥

म्हणे नवरी आणा रांड ।
जाळा नवऱ्याचें तोंड ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

नाशिक विमानतळाच्या खर्चात ५७ कोटींची वाढ!

सुरक्षा निकषांमुळे खर्च वाढला; ६२९ कोटींच्या प्रकल्पाचे ४० टक्के काम पूर्ण!

महाईन्यूज । नाशिक

सिंहस्थ कुंभमेळ्यात प्रवासी हाताळण्याची क्षमता वाढविण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या नाशिक (ओझर) विमानतळाच्या विस्तारीकरणाच्या खर्चात तब्बल ५७ कोटी रुपयांनी वाढ झाली आहे. सुरुवातीला विमानतळाच्या आधुनिकीकरणाच्या कामांसाठी ५७२.५१ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. वेगवेगळ्या कारणांमुळे आता या प्रकल्पाचा खर्च ६२९.४१ कोटी रुपयांवर पोहोचला आहे.

नाशिक-त्र्यंबकेश्वर येथील सिंहस्थ कुंभपर्वाची ध्वजारोहणाने नुकतीच सुरुवात झाली. पुढील वर्षी, म्हणजे २०२७ मध्ये ऑगस्ट आणि सप्टेंबरदरम्यान अमृतस्नान होणार आहे. कुंभमेळ्यात १२ कोटी भाविक सहभागी होण्याचा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने रस्ते, रेल्वे आणि हवाई मार्गाने येणाऱ्या भाविकांसाठी पायाभूत सुविधांची व्यापक कामे हाती घेतली आहेत. त्यातील एक म्हणजे नाशिक विमानतळाचे विस्तारीकरण.

या प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या (एमएसआयडीसी) प्रस्तावानुसार नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने ५७२.५१ कोटी रुपयांना प्रशासकीय मान्यता दिली होती. एमएसआयडीसीने निविदा स्वीकृत केल्यानंतर कामांची अंतिम रक्कम ५९८.४४ कोटी रुपयांवर गेली. त्यामुळे मूळ प्रशासकीय मान्यतेच्या रकमेत २५.९३ कोटी रुपयांची वाढ झाली.

नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्यूरो (बीसीएएस) आणि नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या (डीजीसीए) सुरक्षा व अन्य नियमांनुसार काही आवश्यक उपकरणे आणि कामांमध्ये वाढ करावी लागली, असे एमएसआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. या अतिरिक्त बाबींचा समावेश झाल्यामुळे खर्चात आणखी ३०.९७ कोटी रुपयांची वाढ झाली. अशा प्रकारे विमानतळाच्या कामांसाठी ५६.९० कोटी रुपयांच्या वाढीव निधीची आवश्यकता कुंभमेळा प्राधिकरणासमोर मांडण्यात आली.



काम ४० टक्क्यांवर

विमानतळाच्या नवीन इमारतीची रचना श्रीरामांच्या धनुष्याच्या आकाराची असणार आहे. विस्तारीकरणांतर्गत १८ हजार चौरस मीटर क्षेत्रफळाची अतिरिक्त टर्मिनल इमारत आणि १ हजार ६०० चौरस मीटर क्षेत्रफळाची अतिरिक्त उपयोगिता इमारत उभारण्यात येत आहे. कुंभमेळ्यासाठी नाशिक विमानतळाचे विस्तारीकरण विक्रमी वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. सद्यस्थितीत ४० टक्के काम पूर्ण झाले असून, मार्च-एप्रिलपूर्वी विमानतळाचे काम पूर्ण करण्याची तयारी करण्यात आल्याचे एमएसआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

मानकांच्या पूर्ततेसाठी...

विमानतळाचे काम पायाभूत सुविधा समितीसमोर सादर करण्यात आले, तेव्हा अतिरिक्त निधीची आवश्यकता भासणार नसल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, कामाची निकड आणि बीसीएएस व डीजीसीएची मान्यता मिळविण्यासाठी मानकांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने अतिरिक्त निधीची मागणी मान्य करण्यात आली. त्यानुसार कुंभमेळा प्राधिकरणाने ६२९.४१ कोटी रुपयांच्या कामांना (५६.९० कोटी रुपयांच्या वाढीसह) सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्याची माहिती प्राधिकरणातील विश्वसनीय सूत्रांनी दिली.

विधानपरिषद निकालावरून राज ठाकरेंचा पंतप्रधान मोदींना टोला!

महाईन्यूज । सांगली

मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी आज (३ नोव्हेंबर) मुंबईतील एका कार्यक्रमात बोलताना भारतीय जनता पक्षावर जोरदार टीका केली. पंतप्रधान मोदी यांनी काही दिवसांपूर्वी विधानपरिषद निवडणुकीच्या निकालावर एक पोस्ट शेअर केली होती, त्यावरून राज ठाकरे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार आणि कर्नाटकातील २८ विधानपरिषद जागांच्या निवडणुकीचा उल्लेख करत काँग्रेसला किती जागा मिळाल्या? असा सवाल करत मोदींनी एक पोस्ट शेअर केली होती.

यावरच बोलताना आता राज ठाकरे यांनी मोदी आणि भाजपावर खोचक टीका केली. 'आतापर्यंत कोणत्याही पंतप्रधानांनी विधानपरिषदेच्या स्थानिक निकालांवर अशी प्रतिक्रिया दिली नव्हती', असं राज ठाकरेंनी म्हटलं. "आतापर्यंत अनेक पंतप्रधान होऊन गेले, ज्यांनी अशा प्रकारे विधानपरिषदेच्या निकालावर कुठली कॉमेंट पास केली असं मला आठवत नाही", असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

"आता दोन दिवसांपूर्वी विधानपरिषदेच्या निवडणुका झाल्या. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार किंवा आणखी काही ठिकाणी विधानपरिषदेच्या निवडणुका झाल्या. या निवडणुकीच्या निकालाबाबत आधी सांगितलं की, काँग्रेसची एकही जागा जिंकून आली नाही, सगळ्या जागा भारतीय जनता पक्षाने जिंकल्या वैगेरे. यावर लगेच देशाचे पंतप्रधान ट्विट करतात? विधानपरिषदेच्या काही जागांची निवडणूक आहे आणि त्या निवडणुकीचा निकाल आहे. त्यावर पंतप्रधान ट्विट करतात?", असा सवाल राज ठाकरे यांनी उपस्थित केला.

"आतापर्यंत अनेक पंतप्रधान होऊन गेले आहेत, पण मला आजपर्यंत आठवत नाहीये की त्यांनी अशा प्रकारे किमान प्रतिक्रिया तरी दिली असेल. समजा तेव्हा ट्विटर वैगेरे नसेल, म्हणून त्यांनी वृत्तपत्रात तरी प्रतिक्रिया दिल्या आहेत असंही मला आठवत नाही. अशा शुभेच्छा कधीच कोणत्याही पंतप्रधानांनी दिल्या नाहीत. पण मोदींनी का दिल्या? कारण भाजपा अजूनही विरोधी पक्षाच्या भूमिकेतून बाहेर आलेली नाही", अशी टीका राज ठाकरे यांनी केली.

"भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांकडे मी जेव्हा बघतो, तेव्हा मला असं वाटतं की फक्त सत्ता येऊन चालत नाही किंवा सत्तेत बसून चालत नाही, तर सत्ता तुमच्या अंगात असावी लागते. सत्ता मनात असावी लागते. पण भारतीय जनता पक्ष अजूनही विरोधी पक्षातून बाहेर आलेला नाही. काँग्रेसला अजूनही हे समजत नाही की विरोधी पक्ष कसा असावा. पण गेल्या पाच वर्षात काँग्रेसला समजायला लागलंय", असं राज ठाकरे म्हणाले.



'तुम्ही सत्तेत आहात ना? मग मोर्चे कसले काढता?'

"आता काल भाजपाने मोर्चा काढला आणि सत्तेतही हेच आहेत. सत्तेत असणारा पक्षच मोर्चा काढत आहे की संविधान वाचवा किंवा लोकशाही वाचवा. यावर काल एका व्यक्तीने खूप छान प्रतिक्रिया दिली. भारतीय जनता पक्षाने लोकशाही वाचवा असं सांगणं म्हणजे म्हाताऱ्याने कोंबड्या वाचवा असं सांगण्यासारखं आहे. तुम्ही सत्तेत आहात ना? मग मोर्चे कसले काढत आहात?", अशा शब्दांत राज ठाकरेंनी भाजपाला सुनावलं.

जम्मू-काश्मीरमध्ये राजकीय भूकंप!

"ओमर अब्दुल्लांनी विश्वासघात केला" बड्या नेत्याचा खासदारकीसह पक्षाचा राजीनामा


महाईन्यूज । जम्मू काश्मीर

गेल्या काही दिवसांपासून जम्मू काश्मीरच्या राजकारणात मोठ्या राजकीय घडामोडी घडताना पाहायला मिळत आहेत. जम्मू-काश्मीरमधील मंत्रिमंडळातील फेरबदलानंतर नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे १९ पेक्षा जास्त आमदार नाराज असल्याची चर्चा आहे. एवढंच नाही तर या १९ आमदारांनी एक गुप्त बैठक घेत बंडाचं निशाण फडकावल्याची माहिती समोर आली होती. त्यामुळे ओमर अब्दुल्लांची खुर्ची धोक्यात आल्याच्या चर्चाही राजकीय वर्तुळात सुरू आहेत. असं असतानाच आता ओमर अब्दुल्लांना आणखी एक मोठा धक्का बसला आहे.



जम्मू-काश्मीरमधील सत्ताधारी पक्ष असलेल्या नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे आगा सय्यद रुहुल्ला मेहदी यांनी मंगळवारी बडगाम येथे एका जाहीर सभेत खासदारकीसह पक्षाचा राजीनामा दिला आहे. याच सभेत बोलताना आगा सय्यद रुहुल्ला मेहदी यांनी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्यावर जोरदार टीका केली. 'ओमर अब्दुल्ला यांनी जनतेशी विश्वासघात केला', अशी टीका मेहदी यांनी केली.

आगा सय्यद रुहुल्ला मेहदी यांनी मंगळवारी एका जाहीर सभेत आपल्या लोकसभा सदस्यत्वाचा आणि सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचा राजीनामा दिला. त्यांच्या या निर्णयामुळे नॅशनल कॉन्फरन्सला मोठा धक्का बसला आहे. मात्र, आगा सय्यद रुहुल्ला मेहदी यांनी राजीनामा का दिला? आणि आता त्यांची पुढील भूमिका काय? याबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत.



दरम्यान, आगा सय्यद रुहुल्ला मेहदी यांनी आपल्या निर्णयाची घोषणा करताना मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला आणि पक्षाध्यक्ष फारुख अब्दुल्ला यांच्यावर जोरदार टीका केली. जम्मू-काश्मीरचे घटनात्मक अधिकार पुन्हा बहाल करण्याबाबतच्या जनतेच्या आकांक्षांशी या नेत्यांनी प्रतारणा केली. नॅशनल कॉन्फरन्सने जनतेचा विश्वासघात केला, अशा शब्दांत मेहदी यांनी संताप व्यक्त केला.

मेहदी यांनी राजीनामा पत्रात काय म्हटलं?

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना लिहिलेल्या राजीनामा पत्रात मेहदी यांनी म्हटलं की, "भारतीय राज्यघटनेच्या कलम १०१(३)(ब) अन्वये मिळालेल्या अधिकाराचा वापर करून आणि लोकसभेच्या कार्यपद्धती व कामकाज नियमावलीतील नियम २४० नुसार मी जम्मू-काश्मीरमधील श्रीनगर लोकसभा मतदारसंघाचं प्रतिनिधित्व करणाऱ्या खासदारपदाचा तत्काळ प्रभावाने राजीनामा देत आहे. हा राजीनामा मी स्वेच्छेने आणि पूर्ण जाणीवेतून देत आहे. कृपया तो स्वीकारला जावा."

ओमानच्या किनारपट्टीजवळ भारतीय जहाजावर हल्ला; गुजरातच्या खलाशाचा मृत्यू

महाईन्यूज । नेपाळ

पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर ओमानच्या किनारपट्टीजवळ भारतीय जहाजावर झालेल्या हल्ल्यात गुजरातमधील एका खलाशाचा मृत्यू झाला आहे. सोमवारी, २ नोव्हेंबर रोजी होर्मूझच्या सामुद्रधुनीत भारतीय ध्वज असलेल्या 'एमएसव्ही अल जूसुफी' या मालवाहू जहाजावर हल्ला करण्यात आला. या जहाजावरील १४ भारतीय कर्मचाऱ्यांपैकी १३ जणांची ओमानच्या तटरक्षक दलाने सुखरूप सुटका केली. मात्र, जखमी झालेल्या एका खलाशाचा उपचारांपूर्वीच मृत्यू झाला.



केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी या घटनेची माहिती दिली. मृत खलाशाचे नाव गंधार नाहिम अजिज असून ते गुजरातचे रहिवासी होते. या दुखद घटनेबद्दल शोक व्यक्त करताना सोनोवाल यांनी मृताच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या.

भारतीय जहाजावरील हल्ल्याचा परराष्ट्र मंत्रालयानेही तीव्र निषेध केला आहे. ओमानमधील लिमाह परिसराच्या जवळ सोमवारी संध्याकाळी ही घटना घडल्याचे मंत्रालयाने निवेदनात म्हटले आहे. व्यापारी जहाजांवर अशा प्रकारचे हल्ले वारंवार होत असल्याबद्दल केंद्र सरकारने चिंता व्यक्त केली आहे. ओमानमधील भारतीय दूतावास परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून, सुटका करण्यात आलेल्या भारतीय खलाशांना आणि मृत कर्मचाऱ्याच्या पार्थिवदेहाला लवकरात लवकर भारतात आणण्यासाठी ओमानच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधत आहे, असे परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले.

पश्चिम आशियातील संघर्ष तातडीने कमी करण्याचे आवाहन केंद्र सरकारने पुन्हा एकदा केले आहे. या प्रदेशात शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी राजनैतिक तोडगा काढण्याच्या प्रयत्नांना गती देण्याची गरज असल्याचे भारताने म्हटले आहे. व्यापारी जहाजे आणि नागरी पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्याचे प्रकार थांबले पाहिजेत. तसेच आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार या प्रदेशातील जलमार्गांमधून जहाजांची आणि व्यापाराची मुक्त, निर्बंधमुक्त वाहतूक लवकरात लवकर पूर्ववत झाली पाहिजे, अशी भूमिका परराष्ट्र मंत्रालयाने मांडली आहे.

१३ खलाशांची सुटका

जहाजावरील १३ कर्मचाऱ्यांची ओमानच्या तटरक्षक दलाने सुटका केली आहे. या सर्वांना आवश्यक मदत मिळावी आणि त्यांना लवकरात लवकर भारतात परत आणता यावे, यासाठी केंद्रीय मंत्रालय आणि ओमानमधील भारतीय दूतावास स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात आहेत. मृत खलाशाचा मृतदेहही भारतात आणण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सोनोवाल यांनी सांगितले.



जियाचा पलटवार!

बिग बॉस ओटीटीमुळे प्रसिद्धीच्या झोतात आलेली अभिनेत्री जिया शंकर सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. गेल्या काही दिवसांपासून जिया आणि तिचा मंगेतर करण धनक यांच्या नात्यात दुरावा निर्माण झाल्याच्या चर्चा सोशल मीडियावर सुरू होत्या. दोघांचे ब्रेकअप झाल्याचेही दावे केले जात होते. मात्र, आता जियाने स्वतः या चर्चांवर स्पष्टीकरण देत सर्व अफवांना पूर्णविराम दिला आहे. जियाने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर करणसोबतचे काही रोमँटिक फोटो शेअर केले आहेत. यासोबतच तिने एक लांबलचक पोस्ट लिहून त्यांच्या नात्याबद्दल भावना व्यक्त केल्या. विशेष म्हणजे, जियाने पुन्हा एकदा करणला इन्स्टाग्रामवर फॉलो केले आहे. जियाने पोस्टमध्ये म्हटले की, एकत्र आयुष्य जगताना प्रत्येक गोष्ट सोपी नसते. कोणतेही नाते बॉलिवूड चित्रपटासारखे परिपूर्ण नसते. प्रत्येकाची विचार करण्याची पद्धत वेगळी असते. त्यामुळे एकमेकांना समजून घेण्यासाठी वेळ द्यावा लागतो. आम्हीही सामान्य माणसे आहोत. आमचे एकमेकांवर प्रेम आहे आणि आम्ही एकमेकांची निवड केली आहे, असे तिने स्पष्ट केले. तसेच, करणसोबतच्या नात्याबद्दल सोशल मीडियावर केल्या जाणाऱ्या चर्चांमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचेही जियाने सांगितले. यापुढे सोशल मीडियावर पोस्ट करताना अधिक काळजी घेणार असल्याचे तिने नमूद केले. तिच्या या पोस्टमुळे ब्रेकअपच्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला असून चाहत्यांनीही आनंद व्यक्त केला आहे.



'प्रताप'मधून ईशा देओलची दमदार एंट्री!

चित्रपट 'प्रताप'चा टीझर निर्मात्यांनी जारी केला आहे. चित्रपटात अभिनेता अमित साध मुख्य भूमिका साकारत आहे. टीझरमध्ये एक पोलीस अधिकारी आणि त्याच्यामागे रचण्यात आलेला कट दाखविण्यात आला आहे. प्रताप चित्रपटाच्या कहाणीत एका पोलीस अधिकाऱ्याची कहाणी दर्शविण्यात आली आहे. हा पोलीस अधिकारी एका स्फोट प्रकरणात अडकला आहे. या प्रकरणामुळे त्याला नोकरीतून बडतर्फ करण्यात आलेले असते. परंतु तो हार मानत नाही. तुरुंगात असतानाही तो स्वत:ला निर्दोष ठरविण्यासाठी कायद्याची मदत घेतो. या चित्रपटाचे दिग्दर्शन सचिन सराफ यांनी केले असून त्यांनीच याची कहाणी लिहिली आहे. तर चित्रपटाची निर्मिती प्रदीप रंगवानी आणि यूव्ही फिल्म्सकडून करण्यात आली आहे. यापूर्वी सचिनने 'मणिकर्णिका : द क्वीन ऑफ झांसी, बादशाहो, वीर आणि अपने या चित्रपटांमध्ये सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केले आहे. तर प्रताप चित्रपटात अमित साध याच्यासोबत ईशा देओल, तिग्मांशु धुलिया, मिलिंद गुणाजी आणि सीमा विश्वास यांची महत्त्वाची भूमिका आहे. हा चित्रपट 20 नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे.

वादग्रस्त टिप्पणी भोवली; दिग्दर्शक अनुराग कश्यप अडचणीत!

बॉलिवूडचे प्रसिद्ध दिग्दर्शक अनुराग कश्यप पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. ब्राह्मण समाजाबद्दल सोशल मीडियावर कथित आक्षेपार्ह टिप्पणी केल्याच्या प्रकरणात सुरत न्यायालयाने त्यांच्याविरोधात जामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. वारंवार समन्स आणि नोटीस पाठवूनही अनुराग कश्यप न्यायालयात हजर न राहिल्याने न्यायालयाने हे पाऊल उचलले आहे. त्यामुळे आता त्यांच्या कायदेशीर अडचणी वाढण्याची शक्यता आहे. अनुराग कश्यप हे बॉलिवूडमधील प्रसिद्ध दिग्दर्शक असून त्यांच्या चित्रपटांमुळे ते नेहमीच चर्चेत असतात. मात्र, यावेळी ते एका वादग्रस्त सोशल मीडिया टिप्पणीमुळे अडचणीत आले आहेत. गेल्या वर्षी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर त्यांनी केलेल्या काही विधानांमुळे हा वाद सुरू झाला होता.

या विधानांवर ब्राह्मण समाजातील काही लोकांनी आक्षेप घेतला होता. संबंधित टिप्पणीमुळे समाजाच्या भावना दुखावल्याचा आरोप करण्यात आला. त्यानंतर अनुराग कश्यप यांच्याविरोधात कायदेशीर तक्रार दाखल करण्यात आली. या प्रकरणाची दखल घेत सुरत न्यायालयात सुनावणी सुरू झाली.

या प्रकरणाच्या सुनावणीसाठी अनुराग कश्यप यांना न्यायालयाकडून अनेकदा समन्स आणि नोटीस पाठवण्यात आल्या होत्या. मात्र, वारंवार संधी देऊनही ते सुनावणीसाठी



प्रत्यक्ष न्यायालयात उपस्थित राहिले नसल्याचे समोर आले आहे.

न्यायालयीन प्रक्रियेत संबंधित व्यक्तीची उपस्थिती महत्त्वाची असते. विशेषतः एखाद्या तक्रारीच्या सुनावणीदरम्यान आरोपीला आपली बाजू मांडण्याची संधी मिळणे आवश्यक असते. मात्र, वारंवार समन्स पाठवूनही उपस्थिती न लावल्याने न्यायालयाने याची गंभीर दखल घेतली. अखेर सुरत न्यायालयाने अनुराग कश्यप यांच्याविरोधात जामीनपात्र वॉरंट जारी केले. न्यायालयाच्या या निर्णयामुळे या प्रकरणाला आता वेगळे वळण मिळाले आहे.

आजच्या काळात सोशल मीडिया हे कलाकारांसाठी आपले विचार मांडण्याचे महत्त्वाचे माध्यम बनले आहे. मात्र, सार्वजनिक व्यक्तींनी केलेल्या विधानांवर अनेकदा तीव्र प्रतिक्रिया उमटतात. काही वेळा या प्रतिक्रिया केवळ सोशल मीडियापुरत्या मर्यादित न राहता कायदेशीर कारवाईपर्यंत पोहोचतात.

अनुराग कश्यप यांच्या बाबतीतही असेच घडले. ब्राह्मण समाजाबद्दल त्यांनी केलेल्या कथित विधानांवर आक्षेप घेण्यात आला आणि त्यातून कायदेशीर वाद निर्माण झाला. या प्रकरणात तक्रारदार पक्षाकडूनही न्यायालयीन प्रक्रियेत सहकार्य मिळत नसल्याची तक्रार करण्यात आल्याचे वृत्त आहे.

रोहित- विराट परतणार!

भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये होणारा पहिला वनडे सामना भारतीय वेळेनुसार

महाईन्यूज । मुंबई

भारतीय संघ सध्या न्यूझीलंड दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये पार पडलेल्या ५ टी-२० सामन्यांच्या मालिकेत भारतीय संघाने ३-२ ने दमदार विजय मिळवला. टी-२० मालिकेवर कब्जा केल्यानंतर भारतीय संघ आता वनडे मालिका जिंकण्यासाठी मैदानात उतरणार आहे. टी-२० मालिकेतील सुरूवातीचे ३ सामने गमावल्यानंतर शेवटच्या २ सामन्यांमध्ये न्यूझीलंडमध्ये दमदार पुनरागमन केलं. त्यामुळे वनडे मालिकेत दोन्ही संघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळू शकते.



भारतीय संघ वनडेत आणखी ताकदीने मैदानात उतरणार आहे. कारण वनडेतील किंग विराट कोहली आणि रोहित शर्मा संघात परतले आहेत. तसेच कर्णधार शुबमन गिल देखील तुफान फॉर्ममध्ये आहे. तर दुसरीकडे न्यूझीलंडचं टेन्शन वाढलं आहे. कारण संघातील प्रमुख फलंदाज डेवॉन कॉन्व्हे दुखापतग्रस्त झाला आहे. त्यामुळे तो पहिल्या सामन्यातून बाहेर झाला आहे. तसेच मार्क चॅपमन आणि रचिन रवींद्र आधीपासूनच मालिकेतून बाहेर झाले आहेत.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिला वनडे सामना बुधवार, ४ नोव्हेंबर रोजी खेळवला जाणार आहे. या सामन्याबाबत क्रिकेटप्रेमींमध्ये मोठी उत्सुकता असून दोन्ही संघ विजय मिळवण्यासाठी मैदानात उतरणार आहेत. हा सामना ऑकलँडमधील प्रसिद्ध ईडन पार्कच्या मैदानावर रंगणार आहे.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिल्या वनडे सामन्याला भारतीय वेळेनुसार सकाळी ७:३० वाजता सुरुवात होणार आहे. त्यापूर्वी सकाळी ७ वाजता नाणेफेक होईल. त्यामुळे सकाळपासूनच क्रिकेट चाहत्यांना या रोमांचक सामन्याचा आनंद घेता येणार आहे.

या सामन्याचे थेट प्रक्षेपण सोनी स्पोर्ट्स नेटवर्कवर पाहता येणार आहे. तर मोबाईल आणि ऑनलाइन माध्यमातून सामना पाहू इच्छिणाऱ्या प्रेक्षकांसाठी सोनी लिव्ह (Sony LIV) ॲपवर लाईव्ह स्ट्रीमिंगची सुविधा उपलब्ध असेल. त्यामुळे घरबसल्या किंवा प्रवासातही क्रिकेट चाहत्यांना सामन्याचा आनंद घेता येईल.

भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांसाठी ही मालिका महत्त्वाची ठरणार आहे. पहिल्या सामन्यात दमदार कामगिरी करून मालिकेत आघाडी घेण्याचा दोन्ही संघांचा प्रयत्न असेल. भारतीय संघ फलंदाजी आणि गोलंदाजीमध्ये कशी कामगिरी करतो, याकडे चाहत्यांचे विशेष लक्ष असणार आहे. त्यामुळे ईडन पार्कच्या मैदानावर रंगणाऱ्या या पहिल्या वनडे सामन्यात कोणता संघ बाजी मारतो, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

वनडे मालिकेसाठी भारतीय संघ

सुरूवातीच्या ३ वनडे सामन्यांसाठी- शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, श्रेयस अय्यर (उपकर्णधार), केएल राहुल (यष्टीरक्षक), नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, नमन धीर, अंशुल कंबोज, गुरनूर ब्रार, ऋतुराज गायकवाड, अर्शदीप सिंग, ईशान किशन (यष्टीरक्षक), मोहम्मद सिराज, आकिब नबी आणि कुलदीप यादव.

चौथ्या आणि पाचव्या वनडेसाठी असा आहे संघ: श्रेयस अय्यर (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, तिलक वर्मा, ईशान किशन (यष्टीरक्षक आणि उपकर्णधार), नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, नमन धीर, आकिब नबी, गुरनूर ब्रार, ऋतुराज गायकवाड, अर्शदीप सिंग, कुमार कुशाग्र (यष्टीरक्षक), मोहम्मद सिराज, यश ठाकूर आणि कुलदीप यादव

सामना सुरू असताना गोलकीपरची जोरदार धडक, खेळाडूला हृदयविकाराचा झटका

महाईन्यूज । अस्ताना

स्पेनमधील फुटबॉल सामन्यादरम्यान घडलेल्या एका भीषण घटनेने क्रीडा विश्वाला मोठा धक्का बसला आहे. गोलकीपरसोबत झालेल्या जोरदार धडकेत गंभीर जखमी झालेल्या टेनेरिफ संघाचा ३० वर्षीय फुटबॉलपटू जीझस डी मिगेल याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. मंगळवारी सकाळी त्याने अखेरचा श्वास घेतला.



अखेर मंगळवारी सकाळी त्याची प्रकृती आणखी खालावली आणि त्याचा मृत्यू झाला. टेनेरिफ क्लबने अधिकृत निवेदन प्रसिद्ध करून याची माहिती दिली. क्लबच्या माहितीनुसार, सकाळी ८ वाजता (स्थानिक वेळेनुसार) त्याने अखेरचा श्वास घेतला.

या अपघातानंतर सामन्यात मोठा गोंधळ झाला. रेफ्रीने एफसी अँडोराचा गोलकीपर जीझस ओवोनो याला रेड कार्ड दाखवून मैदानाबाहेर पाठवले. त्यानंतर सामना रद्द करण्यात आला. जीझस डी मिगेलच्या मृत्यूने स्पेनमधील फुटबॉल विश्वाला मोठा धक्का बसला आहे. एफसी अँडोराचा प्रमुख भागधारक जेराई पिके यानेही सोशल मीडियावरून दुःख व्यक्त केले. "ही बातमी ऐकून मला खूप दुःख झाले आहे. जीझस, तुला भावपूर्ण श्रद्धांजली. तुझ्या आत्म्यास शांती लाभो," अशा भावना त्याने व्यक्त केल्या.

रिअल माद्रिद, बार्सिलोना, ॲटलेटिको माद्रिद यांसारख्या स्पेनमधील नामांकित फुटबॉल क्लबनीही या घटनेवर दुःख व्यक्त केले. स्पॅनिश फुटबॉल महासंघानेदेखील दुःख व्यक्त केले आहे. फुटबॉल महासंघाने आपल्या निवेदनात म्हटले की, "या दुःखद बातमीने आम्ही हादरलो आहोत. जीझस डी मिगेलच्या निधनाबद्दल आम्ही मनापासून दुःख व्यक्त करतो."

या दुर्दैवी घटनेनंतर संपूर्ण फुटबॉल विश्वातून शोकसंवेदना व्यक्त केल्या जात आहेत. मैदानावरील खेळाडूंच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. एका प्रतिभावान फुटबॉलपटूच्या अकाली निधनामुळे त्याचे सहकारी, चाहते आणि क्रीडाप्रेमींमध्ये शोककळा पसरली आहे. स्पेनमधील फुटबॉल चाहत्यांकडून जीझस डी मिगेल याला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली जात आहे.

नेमकी घटना काय?

स्पेनमध्ये सुरु असलेल्या फुटबॉल सामन्यात सीडी टेनेरिफ आणि एफसी अँडोरा हे दोन संघ आमनेसामने होते. सामना २-२ अशा बरोबरीत सुरू होता. सामन्याच्या शेवटच्या टप्प्यात एफसी अँडोराचा गोलकीपर जीझस ओवोनो बॉल अडवण्यासाठी गोलपोस्ट सोडून मैदानाच्या मध्यभागी धावला. याच वेळी त्याची टेनेरिफचा स्ट्रायकर जीझस डी मिगेल याच्याशी जोरदार धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की डी मिगेल गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने दवाखान्यात नेण्यात आले. स्पॅनिश माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, त्याला हृदयविकाराचा झटका आला होता. डॉक्टरांनी त्याचे हृदय पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांना यश आले होते.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। बुधवार ।
दि. 04 नोव्हेंबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



हिंजवडी-माण डीपी रस्त्यांच्या भूसंपादनाला गती द्या

टीडीआर प्रक्रिया महिनाभरात पूर्ण करण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांचे निर्देश

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

हिंजवडी-माण-मारुंजी परिसरातील प्रस्तावित सहा विकास आराखडा (डीपी) रस्त्यांच्या भूसंपादनाला गती देऊन टीडीआर प्रक्रिया एका महिन्यात पूर्ण करावी, तसेच रस्ते विकासाची कामे डिसेंबरपासून सुरू करण्याच्या दृष्टीने निविदा व प्रशासकीय प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.



परिसरातील वाढती वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरवस्था, पाणीपुरवठा, औद्योगिक क्षेत्रातील नागरी सुविधा आणि पायाभूत विकासकामांचा डुडी यांनी सोमवारी (दि. २) आढावा घेतला. बैठकीला पीएमआरडीए, एमआयडीसी, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस, महापालिका आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

हिंजवडी परिसरातील स्टॉर्म वॉटर ड्रेनेज, जंक्शन अपग्रेडेशन आणि अन्य पायाभूत सुविधांच्या सुधारणांसाठी निधीला मंजुरी मिळाली आहे. या कामांसाठी आवश्यक प्रस्ताव, अंदाजपत्रके आणि निविदा तातडीने तयार करून मंजुरीची प्रक्रिया पूर्ण करावी. डिसेंबरमध्ये प्रत्यक्ष कामे सुरू करता येतील, या दृष्टीने सर्व विभागांनी पूर्वतयारी करावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

हिंजवडी-माण-मारुंजी परिसरातील सहा प्रस्तावित डीपी रस्त्यांसाठी जमीनमालकांची संमतीपत्रे प्राप्त करून भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करा, यापैकी दोन रस्त्यांसाठी शेतकऱ्यांनी एफएसआयच्या माध्यमातून सहमती दर्शविली असून, या रस्त्यांची प्रक्रिया पहिल्या टप्प्यात पुढे न्यावी. उर्वरित रस्त्यांसाठी जमीनमालकांसोबत स्वतंत्र बैठका घेऊन निर्णय घ्यावा. संबंधित मुख्य अभियंता आणि भूसंपादन अधिकाऱ्यांनी कार्यवाहीला गती देऊन टीडीआर प्रक्रिया एका महिन्याच्या आत पूर्ण करावी. सहाही रस्त्यांच्या भूसंपादनाचा कालबद्ध कार्यक्रम आणि प्रत्यक्ष काम सुरू करण्याचे नियोजन पुढील बैठकीत सादर करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

याशिवाय, परिसरातील वाहतूक व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक उपाययोजना प्राधान्याने राबविण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. औद्योगिक क्षेत्रातील कामगार आणि नागरिकांना दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. मंजूर विकासकामांमध्ये कोणताही विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी. प्रत्येक कामाचा नियमित आढावा घेऊन त्यातील अडचणी तातडीने दूर कराव्यात. हिंजवडीसह माण-मारुंजी परिसरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करून नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यावर प्रशासनाने भर द्यावा, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

दोन टीएमसी पाणी नियोजन

वाढती लोकसंख्या आणि औद्योगिक गरज लक्षात घेऊन दोन टीएमसी पाणी नियोजनाचे सविस्तर सादरीकरण करण्याच्या सूचना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला देण्यात आल्या. पाणीपुरवठ्याचे सद्यस्थितीतील विवरण, उपलब्ध स्रोत आणि भविष्यातील नियोजन स्पष्ट करा, तसेच घनकचरा व्यवस्थापनासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने आजूबाजूच्या गावांमधील कचरा संकलित करून त्याची नियमानुसार विल्हेवाट लावण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतींसोबत आवश्यक करारनामे करावेत. प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून नियमित व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन व्यवस्था कार्यान्वित करावी, असे निर्देश डुडी यांनी दिले.

मावळमध्ये अवकाळीचा भातपिकाला फटका; कापणी करून शेतात ठेवलेले भात भिजले

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

मावळ तालुक्यात गेल्या दोन दिवसांत झालेल्या अवकाळी पावसामुळे भात उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. कापणी करून शेतात वाळत ठेवलेले भात भिजल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे, मात्र दुसरीकडे रब्बी हंगामासाठी हा पाऊस फायदेशीर ठरण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे अवकाळी पाऊस भात उत्पादकांसाठी संकट ठरत असला, तरी रब्बी हंगामासाठी वरदान ठरण्याची आशा व्यक्त केली जात आहे.



मावळ तालुक्यातील पवन मावळ, नाणे मावळ तसेच अंदर मावळ या ग्रामीण भागात भातकापणीची कामे सुरू आहेत. अनेक शेतकऱ्यांनी भात कापून शेतात वाळत घातले आहे. कापलेले भात सुरक्षित ठिकाणी नेण्याची लगबग सुरू असतानाच अचानक आलेल्या पावसाने शेतकऱ्यांची धावपळ उडाली. भात भिजल्याने त्याचा दर्जा घसरण्याची, दाण्याला कोंब फुटण्याची तसेच साठवणुकीत अडचणी निर्माण होण्याची भीती आहे. परिणामी, उत्पादनासाठी केलेला खर्च आणि वर्षभराची मेहनत वाया जाण्याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.

एकीकडे भातपिकाचे नुकसान होत असताना दुसरीकडे अवकाळी पावसामुळे जमिनीतील ओलावा वाढण्यास मदत होणार आहे. त्यामुळे रब्बी हंगामातील गहू, हरभरा, ज्वारी तसेच अन्य पिकांच्या पेरणीसाठी काही भागांत अनुकूल परिस्थिती निर्माण होऊ शकते. पाण्याची उपलब्धता वाढल्यास पिकांना त्याचा फायदा होण्याची शक्यता आहे. विशेषतः पावसाअभावी चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांना या पावसामुळे काहीसा दिलासा मिळू शकतो.

अवकाळी पावसामुळे एका बाजूला तयार भातपीक वाचविण्याची धडपड, तर दुसऱ्या बाजूला रब्बी हंगामाच्या नियोजनाची तयारी, अशी दुहेरी कसरत शेतकऱ्यांना करावी लागत आहे. त्यामुळे प्रशासन आणि कृषी विभागाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मार्गदर्शन व मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे.

कापणीच्या हंगामात पावसाचा फटका

यंदा भातपिकाच्या कापणीच्या काळातच पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. भात कापणी, मळणी आणि सुरक्षित साठवणुकीसाठी अतिरिक्त मजुरी व खर्च करावा लागत आहे. भिजलेले भात पुन्हा वाळवणे, त्याची गुणवत्ता टिकवणे आणि बाजारात योग्य भाव मिळवणे ही आव्हाने शेतकऱ्यांसमोर उभी राहिली आहेत. त्यामुळे कृषी विभागाने नुकसानग्रस्त क्षेत्राची पाहणी करून पंचनामे करावेत आणि बाधित शेतकऱ्यांना नियमानुसार मदत द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.


आरकेएल गॅलेक्सीची दमदार भरारी!

'उड्डाण ०.४' राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेत उत्कृष्ट नृत्यकौशल्याच्या जोरावर पटकावले उपविजेतेपद!

महाईन्यूज ।
पिंपरी- चिंचवड

कला आणि संस्कृतीचा भव्य महोत्सव ठरलेल्या 'उड्डाण ०.४' या राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेत पिंपरी येथील आरकेएल गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी दिमाखदार कामगिरी करत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत शाळेने एकूण विजेतेपदाच्या (Overall Title Trophy) शर्यतीत तृतीय क्रमांक पटकावत आपल्या कलागुणांचा ठसा उमटवला.





विविध नृत्यप्रकारांतील सुवर्णयश

- **पाश्चात्त्य नृत्य (Western Dance) :** इयत्ता तिसरीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या ऊर्जावान सादरीकरणाने द्वितीय क्रमांक पटकावला.
- **शास्त्रीय नृत्य (Classical Dance) :** इयत्ता सातवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट शास्त्रीय नृत्याविष्कार सादर करत तृतीय क्रमांकावर मोहर उमटवली.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आचार्य अत्रे सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेत राज्यातील ६ हून अधिक जिल्ह्यांतील १०० पेक्षा जास्त शाळांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता. या अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत आरकेएल गॅलेक्सीच्या विद्यार्थ्यांनी उत्तम तालबद्धता, सांघिक समन्वय आणि आत्मविश्वासाच्या बळावर उपस्थितांची व परीक्षकांची मने जिंकली.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची कठोर मेहनत, नृत्यदिग्दर्शकांचे कुशल मार्गदर्शन, शिक्षकांचे सहकार्य आणि पालकांचे प्रोत्साहन लाभले. या यशाबद्दल बोलताना शाळा व्यवस्थापनाने सर्व विजेते व सहभागी विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक आणि नृत्यदिग्दर्शकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. "शाळा केवळ शैक्षणिक प्रगतीवरच भर न देता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व कलागुणांना वाव देण्यासाठी कटिबद्ध आहे. या यशामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि शिस्तीची भावना अधिक दृढ झाली आहे," असा विश्वास शाळा व्यवस्थापनाने व्यक्त केला. या यशामुळे संपूर्ण आरकेएल गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल परिवारात उत्साहाचे आणि अभिमानाचे वातावरण पसरले आहे.


या स्पर्धेतील यश हे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळालेली मोठी दाद असून, त्यांच्या मेहनतीचे आणि सांघिक भावनेचे फलित आहे. स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याविष्काराने आरकेएल गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या कलात्मक गुणवत्तेची प्रभावी छाप उमटवली. या उल्लेखनीय कामगिरीमुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, भविष्यातही विद्यार्थी विविध क्षेत्रांत अशीच यशस्वी कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

जिल्हास्तरीय जिम्नॅस्टिक ॲक्रोबॅटिक स्पर्धेत एस. बी. पाटील पब्लिक स्कूलचे यश

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

जिल्हास्तर शालेय जिम्नॅस्टिक ॲक्रोबॅटिक स्पर्धेमध्ये १९ वर्षा खालील गटात एस. बी. पाटील पब्लिक स्कूल च्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारात उल्लेखनीय यश मिळवले. निगडी येथील इलाईट जिम्नॅस्टिक सेंटर येथे झालेल्या या स्पर्धेत मुलींमध्ये कृष्णल खंडागळे ६ वी व सावनी बडवे ७ वी यांनी तसेच मिश्र जोडी मध्ये ओम पाटील १० वी व ओवी निकम ९ वी यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.





तसेच मुलांच्या गटात विश्वतेज डेरे ७ वी आयुष मगर ६ वी आणि वेदांत देशपांडे ९ वी अक्षत वारके ९ वी यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. त्याचबरोबर रुद्र जंगीरवाड ९ वी अमित कोडगोनोरा ९ वी यांनी तृतीय क्रमांक पटकाविला.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी स्पर्धेत विजेत्या झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

मुख्याध्यापक डॉ. बिंदु सैनी, उपमुख्याध्यापक पद्मावती बंडा, क्रीडा शिक्षक धनाजी पाटील यांनी मार्गदर्शन केले.

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

APPROVED BY BAR COUNCIL OF INDIA

SCHOOL OF
LEGAL STUDIES

Learn Law. Lead Change.

BA LLB (Hons)
5 YEARS INTEGRATED PROGRAM

BBA LLB (Hons)
5 YEARS INTEGRATED PROGRAM

#2
(IIRF Rankings 2026)
Among New Age Private Universities- In Maharashtra

Moot Court & Practical Training

Legal Aid Support



ADMISSIONS OPEN 2026

+91-8600091180 admission@dypiu.ac.in www.dypiu.ac.in